SAKAL, Thane, 9.1.2025
Page No. 2, Size:(9.37)cms X (6.13)cms.

**Inspection of Bridge of Bullet Train Corridor**

# बुलेट ट्रेन कॉरिडॉरच्या पुलाची पाहणी

## वैतरणा नदीवर सर्वात मोठा पूल; मुंबई-अहमदाबाद प्रवास वेगवान

ठाणे शहर/मनोर ता. ८ (बातमीदार) : बुलेट ट्रेनसाठी वैतरणा नदीवर पालघर जिल्ह्यात सर्वात मोठा पूल बांधला जात आहे. त्याआधी तात्पुरता बांधण्यात आलेल्या पुलाची सोमवारी (ता. ६) एनएचएसआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता यांनी पाहणी केली आहे.

या पुलाची लांबी २.३२ किलोमीटरची असून, या पुलामुळे बुलेट ट्रेनचा अहमदाबादला जाण्याचा मार्ग अधिक गतिशील होणार आहे. मुंबईच्या बीकेसीतून सुरू होणारी ही ट्रेन ठाण्यातील ऐरोली, दिवा मार्गाने पालघर, सुरत आणि पुढे अहमदाबादला जाणार आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन भारतातील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प आहे. या ट्रेनची गती सुमारे ३२० किमी असून, अवघ्या तीन तासांत अहमदाबादला पोहोचणार आहे.

ठाण्यातून पुढे पालघरमार्गे सुरत, अहमदाबादला हा मार्ग जाणार आहे. या मार्गिकेसाठी जपानी आणि भारतीय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. गुजरातमध्ये प्रवेश करणारी ही ट्रेन पालघर जिल्ह्यातील वैतरणा नदीवरून जाणार आहे.



ठाणे : बुलेट ट्रेनच्या बोगद्याची पाहणी एनएचएसआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता यांनी केली.

### गुंतागुंतीचा मार्ग :

यासोबतच पालघर जिल्ह्यातील इतर डोंगरी बोगदा आणि दोन्ही बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या गुंतागुंतीच्या विरार बुलेट ट्रेन स्थानकाचाही गुप्ता यांनी आढावा घेतला.

### सर्वात लांब बोगदा

वैतरणा नदीवरील पूल बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी २.३२ किमीचा सर्वात लांब नदी पूल पालघर जिल्ह्यातील जलसर येथे सुरू आहे. एमएएचएसआर कॉरिडॉरच्या सर्वात लांब डोंगरी बोगद्याच्या बांधकामाचीही त्यांनी पाहणी केली. हा १.४ किमी (अंदाजे) बोगदा न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एनएटीएम) वापरून तयार केला जात आहे.

SAKAL, PALGHAR, 9.1.2025
Page No. 2, Size:(9.37)cms X (6.13)cms.

**Inspection of Bridge of Bullet Train Corridor**

# बुलेट ट्रेन कॉरिडॉरच्या पुलाची पाहणी

## वैतरणा नदीवर सर्वात मोठा पूल ; मुंबई-अहमदाबाद प्रवास वेगवान

ठाणे शहर/मनोर ता. ८ (बातमीदार) : बुलेट ट्रेनसाठी वैतरणा नदीवर पालघर जिल्ह्यात सर्वात मोठा पूल बांधला जात आहे. त्याआधी तात्पुरता बांधण्यात आलेल्या पुलाची सोमवारी (ता. ६) एनएचएसआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता यांनी पाहणी केली आहे.

या पुलाची लांबी २.३२ किलोमीटरची असून, या पुलामुळे बुलेट ट्रेनचा अहमदाबादला जाण्याचा मार्ग अधिक गतिशील होणार आहे. मुंबईच्या बीकेसीतून सुरू होणारी ही ट्रेन ठाण्यातील ऐरोली, दिवा मार्गाने पालघर, सुरत आणि पुढे अहमदाबादला जाणार आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन भारतातील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प आहे. या ट्रेनची गती सुमारे ३२० किमी असून, अवघ्या तीन तासांत अहमदाबादला पोहोचणार आहे.

ठाण्यातून पुढे पालघरमार्गे सुरत, अहमदाबादला हा मार्ग जाणार आहे. या मार्गिकेसाठी जपानी आणि भारतीय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. गुजरातमध्ये प्रवेश करणारी ही ट्रेन पालघर जिल्ह्यातील वैतरणा नदीवरून जाणार आहे.



**ठाणे** : बुलेट ट्रेनच्या बोगद्याची पाहणी एनएचएसआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता यांनी केली.

### गुंतागुंतीचा मार्ग :

यासोबतच पालघर जिल्ह्यातील इतर डोंगरी बोगदा आणि दोन्ही बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या गुंतागुंतीच्या विरार बुलेट ट्रेन स्थानकाचाही गुप्ता यांनी आढावा घेतला.

### सर्वात लांब बोगदा

वैतरणा नदीवरील पूल बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी २.३२ किमीचा सर्वात लांब नदी पूल पालघर जिल्ह्यातील जलसर येथे सुरू आहे. एमएएचएसआर कॉरिडॉरच्या सर्वात लांब डोंगरी बोगद्याच्या बांधकामाचीही त्यांनी पाहणी केली. हा १.४ किमी (अंदाजे) बोगदा न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एनएटीएम) वापरून तयार केला जात आहे.

MAHARASHTRA TIMES, Vasai, 9.1.2025
Page No. 1, Size:(18.40)cms X (10.23)cms.

**Inspection by Directors of National High Speed Rail Corporation, Bullet train works in Palghar**

**मटा अँकर** | **नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनच्या संचालकांकडून पाहणी**

# पालघरमध्ये बुलेट ट्रेनचे काम सुसाट

**म. टा. वृत्तसेवा, पालघर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम प्रचंड वेगाने सुरू असून, अनेक ठिकाणी नदीपात्राखालून, तर डोंगरात भुयार खोदून बोगदा करण्यात येत आहे. या बुलेट ट्रेनचे काम विविध टप्प्यांमध्ये सुरू असून, पालघरमधील या कामांची 'नॅशनल हाय स्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि'चे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता यांनी नुकतीच पालघर जिल्ह्यातील बांधकाम स्थळांची पाहणी केली.

बुलेट ट्रेनचा हा प्रकल्प मुंबई, ठाणे, पालघर व गुजरात अशा मार्गाने जात असून, पालघर जिल्ह्यातील वैतरणा नदीवरील तात्पुरत्या प्रवेश पुलाच्या बांधकामाचा त्यांनी आढावा घेतला. एका बाजूला पश्चिम रेल्वेमार्ग आणि दुसऱ्या बाजूला दलदलीचा भाग यांच्यामध्ये वसलेला तात्पुरता प्रवेश पूल हा मुख्य पुलाच्या बांधकामासाठी मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची वास्तू आहे. त्याची पाहणीही संचालक गुप्ता यांनी यावेळी केली.

उषा पाटील





### विरार बुलेट ट्रेन स्थानकाचा घेतला आढावा

पालघर जिल्ह्यात बुलेट ट्रेनला अवघे दोन थांबे दिले जातील, असे 'नॅशनल हाय स्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि.'ने बुलेट ट्रेनचा आराखडा मंजूर करताना किंवा जाहीर करताना नमूद केले आहे. जिल्ह्यातून हा प्रकल्प जात असताना प्रकल्पाच्या दोन्ही बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या गुंतागुंतीची वास्तू असलेल्या विरार बुलेट ट्रेन स्थानकाचाही त्यांनी यावेळी आढावा घेतला.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईच्या लगतच्या पालघर जिल्ह्यातील वैतरणा नदीवरील पूल बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी २.३२ किमीचा सर्वांत लांब नदीवरील पूल असून, या पुलाचे बांधकाम प्रचंड वेगाने सुरू असून दिवस-रात्र शेकडो कामगार त्यासाठी काम करत आहेत. हे काम तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे का, तसेच त्याची गुणवत्ता आणि वेग याचा मेळ जुळत आहे की नाही; तसेच हे काम किती वेळात पूर्ण होईल, याची पाहणी देखील गुप्ता यांनी यावेळी केली. पालघर जिल्ह्यातील जलसर येथे असलेल्या एमएएचएसआर कॉरिडॉरच्या सर्वांत लांब डोंगरी बोगद्यासाठी सुरू असलेल्या बांधकामाची ही त्यांनी पाहणी केली. हा १.४ किमी (अंदाजे) बोगदा ऑस्ट्रियन भुयारी पद्धत (एनएटीएम) वापरून तयार केला जात आहे. पालघर जिल्ह्यातील इतर डोंगरी बोगद्यांच्या कामाचीही गुप्ता यांनी पाहणी केली.